# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 22/09/2020 (मंगळवार)
(सकाळ)

---

### चोरी

पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 10 कि.मी. मौजा वडोदा शिवार कामठी येथे दिनांक 20/09/2020 चे 21/00 वा. ते 21/09/2020 चे 03/00 वा. सुमारास फिर्यादी नामे– पोलीराम यादव मेंढे, वय 40 वर्षे रा. वडोदा ता. कामठी हे नागपुर येथे राहत असून त्यांची शेती ही वडोदा शिवारात असून व शेती मध्ये दोन मंजली घर आहे. त्या घरा मध्ये फिर्यादी राहतात फिर्यादी यांचा रेडमी कंपनीचा मोबाइल कि. 5,000/–रू. तसेच त्यांच्या मुलाचा ओपो कंपनीचा मोबाईल 6,000/–रू. तसेच पॅन्टचे खिशामधील पॉकिट मध्ये ठेवलेले नगदी 10,000/–रू. तसेच लायसन्स व आधार कार्ड, पॅनकार्ड असा एकुण कि. 21,000 /–रू. चा मुदेमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा जंगवाड 8329948101 हे करीत आहे.

### अपघातात मृत्यु

1) पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 4 कि.मी. अंतरावरील नागपूर जबलपूर एनएच– 07 रोड कुंभलकर ढाब्याचे समोर येथे दिनांक 20/09/2020 चे 14:00 वा. चे 14:15 वा. दरम्यान एमएच– 40/एएल– 0582 क्रमांकाचा ॲक्टीव्हा मोपेडचा चालक आरोपी नामे– आकाश चिचमलकर याने त्याच्या गाडीवर मागे मृतक नामे– कु नंदीनी धर्मराज सींगाळे, वय 20 वर्ष, रा. छोटा ताजबाग नागपुर हिला बसवुन त्याचे ताब्यातील टुव्हीलर वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन वाहन स्लिप होवुन रोडवर पडला. या अपघातात नंदीनी सींगाळे हिला गंभीर जखम झाल्याने उपचार दरम्यान तिचा मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– तेजस धर्मराज शिगाडे, वय 25 वर्ष, रा. यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री. आत्राम हे करीत आहे.

2) पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 7 कि.मी. अंतरावरील सिंगोरी शिवार मौदा येथे दिनांक 21/09/2020 चे 16:15 वा. दरम्यान मृतक नामे– अरूण मारोती सोनकुसरे, वय 50 वर्ष व मंगला अरूण सोनकुसरे, वय 45 वर्ष, दोन्ही रा. वांजरे लेआउट, कळमणा, नागपुर हे दोघेही पती पत्नी असुन ते एमएच– 30/एक्स– 368 क्रमांकाच्या मोटरसायकलने नागपुर वरून भंडारा कडे जात होते. त्यादरम्यान मारोडी ते सिंगोरी येथे गावाचे रस्त्यांनी जात असतांना मागुन नागपुर कडुन भंडाराच्या दिशेने येणारा आरजे –07/जीबी–7149 क्रमांकाचा कंटेनरचा चालक आरोपी नामे– बसंत छोटेलाल साहु, वय 43 वर्ष, रा. बैतुल (म.प्र) याने त्याच्या ताब्यातील कंटेनर भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मृतकच्या मोटरसायकला धडक मारल्याने व पती पत्नी जागीच ठार झाले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– देवीदास मारोती सोनकुसरे, वय 43 वर्ष, रा. कळमना मार्केट ब्रिज विनोबा भावे नगर, नागपूर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी.

सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपानि काळे 8380887452 हे करीत आहे.

3) पो.स्टे. केळवद :– अंतर्गत 12 कि.मी. अंतरावरील मौजा भागेमाहेरी शिवार पांढर्णा नागपूर हायवे क्र. 47 वरील येथे दिनांक 20/09/2020 चे 20:00 वा. ते 20.15 वा. दरम्यान मृतक नामे– अजीज खान जीमल खान, वय 45 वर्ष, रा. मानकापुर हा नांदागोमुख येथुन निघुन त्याच्या राहते घरी मानकापुर नागपुर येथे हायवे रोडने आपल्या ताब्यातील महेन्द्रा मोपेड गाडी क्र एमएच– 31/इटी 0654 ने येत असता त्याच्या वाहनाला अज्ञात वाहनाने कट मारल्याने तो गाडीसह रोडच्या साईडला झाडाझुडपीत पडला. या अपघातात अजीज खान याच्या डोक्याला मार लागुन व हातापायला खरचटल्याने तो जखमी होवुन मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– मोहम्मद बाबर मो. कबार, वय 35 वर्ष, रा. हवालदारपुरा वार्ड 13 जि वर्धा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. केळवद येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपानि सुरेश मट्टामी 9422615327 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर